# नागरिकांची सनद

## कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परेल, मुंबई ४०० ०१२.

**संस्थेचे ध्येय (Mission Statement)**

महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक क्षेत्रात शांतता नांदण्याकरिता मालक व कामगार यांच्यामध्ये संबंध सौदार्हपूर्ण रहाण्यासाठी कामगार कल्याण व उत्पादकता वाढवण्याकरिता आवश्यक असणारी मानवी संसाधने व्यावसायिक (**Professional**) तत्वावर विकसित करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन करणे.

**उद्दिष्टये व कार्ये**

अ) **कल्याण अधिकारीयांचे** व्यावसायिक प्रशिक्षण कारखाना कायदा,१९४८ याप्रमाणे देणे.
ब) औद्योगिक संबंध आणि व्यवस्थापन खाजगी, सार्वजनिक व सहकार क्षेत्रात काम करणा-यांसाठी व्यावसायिक व नेतृत्व गुण याविषयी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.
क) कामगार व त्या संबंधीत क्षेत्रातील विषयांबाबत संशोधन प्रकल्प हाती घेणे, ते पूर्ण करणे व त्याचे प्रकाशन करणे.
ड) कामगार क्षेत्राचे व्यावसायिक स्थान व दर्जा वाढविण्यास हातभार लावणारे कार्यक्रम याचे आयोजन करणे.

कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, ही भारतातील अशी एकमेव संस्था आहे की, ज्यात शासनातर्फे औद्योगिक क्षेत्रात शांतता नांदण्याकरिता, उत्पादकता वाढविण्याकरिता पर्यायाने उत्पादन वाढवून कामगारांचे समाधान वाढविण्याकरिता ठोस प्रयत्न केले जातात. या प्रयत्नामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा उल्लेख करता येईल. एक म्हणजे प्रतिवर्षी महाराष्ट्रातील ५३ पदवी धारकांना २ वर्षाचा उद्योग आणि कामगार विषया संबंधातील पदव्युत्तर पदवीचे शिक्षण देणे, मुंबई विद्यापीठाची सदर पदव्युत्तर पदवी घेतलेले विद्यार्थी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी उद्योग क्षेत्रात महत्वाच्या जागेवर कार्यरत आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे कामगारांच्या प्रतिनिधींना आवश्यक ज्ञानाची जोड देऊन लोकहितैषी कामगार प्रतिनिधी बनविणे. ९ महिन्याच्या कालावधीच्या पदविका अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शासन हा प्रयत्न गेले अनेक वर्ष करीत आहे.अशाच प्रकारचा प्रयत्न शासन प्रादेशिक कामगार संस्था, नागपूर येथेही करत आहे.

कामगार विभागातील शासकीय अधिका-यांची मनोवृत्ती, क्षमता यामध्ये निरीक्षकांच्या जबाबदारीपेक्षा फॅसिलीटेटरची (मदतनीसाची) जबाबदारी पार पाडणारा अधिकारी वर्ग तयार करण्याचे कामही संस्था उपलब्ध वेळेत करत असते, आणि याकरीता अल्प मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविते. नागरिकांच्या सोयीसाठी वर उल्लेखलेल्या ३ महत्वाच्या जबाबदा-यांच्या माहितीचा तक्ता खालीलप्रमाणे :-

**विभाग- उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.**

**कार्यालयाचे नांव - कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई.**

| अ. क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (नाव/पदनाम/कार्यालयाचा पत्ता/ दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्रमांक) | सेवा विहित कालावधी पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | **मुंबई**<br>**मास्टर ऑफ लेबर स्टडीज** हा दोन वर्षे कालावधीचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाशी संलग्न असुन, या अभ्यासक्रमा करिता एकूण प्रवेश क्षमता ५३ इतकी आहे. | एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये वृत्तपत्रामध्ये प्रवेश प्रक्रियेसंबंधी जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. त्यानुसार मे महिन्यामध्ये प्रवेश फॉर्मची विक्री व स्विकृती आणि जून महिन्यामध्ये प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात येते. जुलै महिन्यात अभ्यासक्रमास सुरुवात होते. | **श्री.ए.का.गटकळ, प्रबंधक**<br>कै.नारायण मेघाजी लोखंडे<br>महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,<br>दादाभाई चमारबागवाला मार्ग,<br>परेल, मुंबई ४०० ०१२.<br>दुरध्वनी-२४१२५३३२<br>फॅक्स -२४१२३०३५ | **डॉ.रा.मो.तुंगारे**<br>**संचालक**<br>कै.नारायण मेघाजी लोखंडे<br>महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,<br>दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल,<br>मुंबई ४०० ०१२.<br>दुरध्वनी-२४१२५३३२<br>फॅक्स -२४१२३०३५ |
| २ | **नागपूर**<br>**मास्टर ऑफ लेबर स्टडीज** हा दोन वर्षे कालावधीचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नागपूर विद्यापीठाशी संलग्न असुन, या अभ्यासक्रमा करिता एकूण प्रवेश क्षमता ४० इतकी आहे. | मे महिन्यामध्ये जाहिरात देऊन प्रवेश फॉर्मची विक्री व स्विकृती आणि जुलैमध्ये निवड परीक्षा व अभ्यासक्रमाला सुरुवात होते. | **श्री. अ.स. लाकसवार**<br>अपर कामगार आयुक्त नागपूर व उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार,<br>प्रादेशिक कामगार संस्था,<br>गायत्रीनगर, आयटी पार्कजवळ,<br>व्हीएनआयटी च्या समोर,<br>नागपूर ४४००२२.<br>दुरध्वनी-०७१२-२२३९९३८ | **डॉ.रा.मो.तुंगारे**<br>**संचालक**<br>कै.नारायण मेघाजी लोखंडे<br>महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,<br>दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२.<br>दुरध्वनी - २४१२५३३२<br>फॅक्स - २४१२३०३५ |
| ३ | **मुंबई**<br>**कामगार संघटना व औद्योगिक संबंध** हा ९ महिने कालावधीचा पदविका अभ्यासक्रम कामगार संघटनेच्या सक्रिय कार्यकर्त्यांसाठी असुन, एकूण प्रवेश क्षमता २५ इतकी आहे. | या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता एप्रिलच्या शेवटच्या आठवडयात जाहिरात देण्यात येते. मे महिन्यामध्ये फॉर्मची विक्री व स्विकृती केली जाते. जून च्या शेवटच्या आठवडयात उमेदवारांची मुलाखत घेऊन निवड केली जाते. जुलै महिन्यात अभ्यासक्रमास सुरुवात होते. | **श्री.ए.का.गटकळ, प्रबंधक**<br>कै.नारायण मेघाजी लोखंडे<br>महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था,<br>दादाभाई चमारबागवाला मार्ग,परेल, मुंबई ४०० ०१२.<br>दुरध्वनी-२४१२५३३२<br>फॅक्स -२४१२३०३५ | **डॉ.रा.मो.तुंगारे**<br>**संचालक**<br>कै.नारायण मेघाजी लोखंडे<br>महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२.<br>दुरध्वनी-२४१२५३३२<br>फॅक्स — २४१२३०३५ |